डॉ. मनोज नरेंद्र रेड्डी
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
Email Id:sports.mudept@gmail.com
Website: www.mu.ac.in

मुंबई विद्यापीठ

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
एम् – रोड, मुंबई – ४०० ०२०.
फोन क्र. ०२२ – २२८२ ६०२७ /
२२८१ ७६९८

विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

दि. ११/०९/२०२४

परिपत्रक:—क्र.क्रीडा/ ०३२/२०२४

प्रति,
मुंबई विद्यापीठाशी सर्व संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालये/संस्थाचे
प्राचार्य/संचालक तसेच विविध विभागातील संचालक/विभागप्रमुख
व प्रभारी संचालक यांना...

**विषय: महाराष्ट्रातील सर्व शाळा, विद्यापीठ व उच्च व तंत्र शिक्षण संस्थेमध्ये मुलींना तिन महिन्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम तात्काळ आयोजित करणेबाबतच्या परिपत्रकांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत......**

**संदर्भ: मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/मवि–१/महिला धोरण/२०२४; दि. ०५/०९/२०२४**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये कळविण्यात येते की, सर्व विद्यापीठ संलग्नित शैक्षणिक संस्था/महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयांतील शिकत असलेल्या **"विद्यार्थिनी/मुलींसाठी तीन महिन्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणे"** याबाबत कळविण्यात आले आहे.

याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी व झालेल्या कार्यवाहीचा अहवाल क्रीडा विभागाच्या sports.dept@mu.ac.in तसेच mavi.dhepune@gov.in या ई–मेल आयडी वर पाठविण्यात यावे.

आपल्या माहितीस्तव मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ०१६ चे परिपत्रक सोबत जोडत आहे.

धन्यवाद!

UNIVERSITY OF MUMBAI * SPORTS & PHY. EDUN. *

संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण

Scanned with OKEN Scanner

Reg|IQD|2024-25|331 dt. 5|09|2024



# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
### ४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर ४११०१६.

Web : www.dhepune .gov. in E-Mail :mavi. dhepune@gov.in
फोन नं.020/26122119,26051512,26130627,26124639 फॅक्स नं. 020/26111153.

क्र.: उशिसं/मवि-१/महिला धोरण/२०२४/ दिनांक: .२०२४

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
२. कुलसचिव, सर्व अकृषी/अभिमत/स्वयं अर्थसहायित विद्यापीठे.

**विषय : महाराष्ट्रातील सर्व शाळा, विद्यापीठ व उच्च व तंत्र शिक्षण संस्थेमध्ये मुलींना तीन महिण्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम तात्काळ आयोजित करणेबाबतच्या परिपत्रकाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत..**

संदर्भ: १. श्री. अमर अनिता जालिंदर एकाड, संस्थापक, दीपू फाऊंडेशन यांचे पत्र दि. ३०.८.२०२४
२. संचालनालयाचे परिपत्रक क्र.: उशिसं/मवि-१/महिला धोरण/२०२४/१३०२ दि. २२.२.२०२४

संदर्भांकित पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महिला धोरण २०१४ मधील मुद्दा क्र. ६.१३ अन्वये "सर्व शिक्षण संस्थांनी मुलींसाठी तीन महिन्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणे." सूचित करण्यात आले आहे.

उपरोक्त सूचनेनूसार कार्यवाही करणेबाबत, आपल्या स्तरावरुन सर्व संलग्नित महाविद्यालयांना विनाविलंब कळविण्याबाबत तसेच विद्यापीटांना विद्यापीठ स्तरावर उपरोक्त सूचनेची अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भ क्र. २ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

संचालनालयाचे पत्र दि. २२.२.२०२४ च्या अनुषंगाने पुढीलपैकी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. -

१. विभागीय सहसंचालक कार्यालयांच्या/विद्यापीठांच्या स्तरावरुन करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करावा.
२. ज्या विभागीय सहसंचालक कार्यालयांकडून/विद्यापीठांकडून अद्याप कार्यवाही झालेली नाही त्यांनी तात्काळ कार्यवाही करुन त्याबाबचा अहवाल संचालनालयास सादर करावा.
३. विभागीय सहसंचालक कार्यालयांनी/विद्यापीठांनी सूचना दिल्यानंतर महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपल्या स्तरावर संकलित करुन एकत्रित स्वरुपात संचालनालयास सादर करावा तसेच ज्या महाविद्यालयांनी अद्याप आपल्या निर्देशानूसार कार्यवाही केली नसेल अशा महाविद्यालयांबाबत आपल्या स्तरावरुन करण्यात येत असलेल्या कारवाईबाबत संचालनालयास अहवाल सादर करावा.

DSD/WDC
DIR(Ph. Ed)
Urgent

Scanned with OKEN Scanner

उपरोक्तपैकी जी कार्यवाही करण्यात आली असेल/करण्यात येत आहे त्याबाबतचा अहवाल संचालनालयाच्या mavi.dhepune@gov.in या ई-मेल आय.डी. वर तात्काळ सादर करावा.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 05-09-2024 15:59:48

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११०१६.

Scanned with OKEN Scanner